महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

# पशुवैद्यकीय व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

जि. लातूर – ४१३ ५१७

जा. क्र. व्ही.सी.यु./७१० /२०२२ दिनांक १४/०७/२०२२

## जाहिर प्रगटन

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयात राजमाता जिजाऊ मुलींचे वसतीगृह मध्ये खानावळ चालू करणेसाठी इच्छुक पुरवठादार/विक्रेत्यांकडून मोहोरबंद लिफाफ्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत. साहित्याचे/पदार्थांचे विवरण खालील सारणीत नमूद केलेले आहे.

| अ.क्र. | साहित्याचे / पदार्थांचे विवरण | दर |
|---|---|---|
| अ | **पेय** | **किंमत (रु.) प्रति नग** |
| १. | चहा | |
| २. | कॉफी | |
| ३. | दूध | |
| ब | **नाश्ता** | **किंमत (रु.) प्रति प्लेट** |
| १. | पोहे | |
| २. | उपमा | |
| ३. | इडली | |
| ४. | डोसा | |
| ५. | पराठा | |
| ६. | पुरीभाजी | |
| ७. | मिसळ पाव | |
| ८. | खिचडी | |
| ९. | आम्लेट पाव / भुर्जी पाव | |
| क | **दुपार आणि सायंकाळचे जेवण** | **किंमत (रु.) प्रति व्यक्ती प्रती महिना** |
| १. | चपाती, भाजी, वरण-भात, लोणचं, पापड, दही, सलाड (पोटभर) | |
| **टीप**: दर रविवारी एक वेळ स्पेशल थाळी (शाकाहारी आणि मांसाहारी) पुरवणे बंधनकारक असेल. | | |

इच्छुक पुरवठादार/विक्रेत्यांनी नियम व अटीं-शर्तींचे अवलोकन करून वरील सारणीत उल्लेख केलेल्या साहित्याचे/पदार्थांचे दरपत्रके संपूर्ण माहिती भरून बंद लिफाफ्यात 'मा. सहयोगी अधिष्ठाता, प.वै.म., उदगीर' यांचे कार्यालयात दि. २५/०७/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा बेताने पाठवावित. लिफाफ्यावर "मुलींचे वसतीगृह मध्ये खानावळ चालू करणे करीता दरपत्रक" असा उल्लेख आवर्जून करावा.

अवाजवी दर, मुदतीनंतर प्राप्त दरपत्रके अथवा इतर आवश्यक बाबींमुळे कोणतेही कारण न देता दरपत्रके रद्द करण्याचे सर्वाधिकार कार्यालयास असतील.

सहयोगी अधिष्ठाता
प.वै.म., उदगीर

**जोडपत्र:** नियम व अटीं-शर्तीं

**प्रतिलिपी (प्रसिद्धीसाठी):**

१. सूचना फलक, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर
२. सूचना फलक, पशु पैदास प्रक्षेत्र, उदगीर
३. सूचना फलक, माफसु उपकेंद्र, उदगीर
४. संकेतस्थळ

# मुलींच्या नवीन वसतिगृहात खानावळीसाठी नियम, अटी व शर्ती समिति पशुवैद्यक आणि पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

जा.क्र. व्ही.सी.यु./एम.आय.सी./७२/२०२२
दि: ०६/०७/२०२२

संदर्भ:- कार्यालयीन आदेश जा.क्र. व्ही. सी. यु/ क. अभियंता/ ५०२/ २२ दि: १०/०६/२०२२

## मुलींच्या नवीन वसतिगृहात खानावळ सुरु करणे बाबत झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत

संदर्भांकित कार्यालयीन आदेशानुसार दि. १४.०६.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता पशुवैद्यकीय सुक्ष्मजीवशास्त्र विभाग, पवैम, उदगीर येथे नवीन मुलींचे वसतिगृह येथील खानावळ भाडे तत्वावर देण्याकरिता नियम, अटी व शर्ती ठरविण्यासाठी करण्यासाठी समितीची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस खालील सदस्यांची उपस्थिती होती.

१. डॉ. एस. पी. आवंडकर- अध्यक्ष
सहाय्यक प्राध्यापक, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

२. डॉ. आर. के. जाधव- सदस्य
सहाय्यक प्राध्यापक, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

३. डॉ. पी. एम. घुले- सदस्य/ सचिव
सहाय्यक प्राध्यापक, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

४. श्री. एन. आर. पवार - सदस्य
सहाय्यक प्राध्यापक, दुग्धतंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर

५. एस. आर. यादव -सदस्य
सहाय्यक प्राध्यापक, मत्स्यविज्ञान महाविद्यालय, उदगीर

सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत नवीन मुलींचे वसतिगृह येथील खानावळ भाडे तत्वावर देण्याकरिता नियम व अति शर्ती ठरविण्यासाठी बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली. झालेल्या चर्चेअंती खालील प्रमाणे नियम आणि अटी शर्ती सविनय सुचविण्यात येत आहेत.

१. खानावळ सुरु करणेकरिता जाहीर प्रगटनाद्वारे निविदा मागवून नित्य शासकीय प्रक्रियेचा अवलंब करावा.
२. अर्धवट, अटीयुक्त व मुदतीनंतर प्राप्त निवीदा स्विकारल्या जाऊ नयेत.
३. मुलींच्या वसतीगृहातील खानावळीकरीता शक्यतो FSSAI State License नोंदणीकृत संस्था/ परवानाधारक कंत्राटदार/ अधिकृत कंत्राटदार यांचेकडून स्पर्धात्मक निवीदा मागविण्यात याव्यात. निविदा भरणाऱ्या कंत्राटदाराकडे FSSAI State License परवाना नसेल आणि अशा कंत्राटदाराची निविदा मंजूर होत असल्यास त्यास खानावळ चालविण्यासाठी निविदा मंजुरीच्या



पशु वैद्यकिय महाविद्यालय
आवक क्रमांक 2060
दिनांक 6/7/22
उदगीर

दोन महिन्याचे आत स्व खर्चाने विहित प्राधिकरणाकडून FSSAI State License परवाना काढून सादर करणे बंधनकारक असावे. त्यास त्यानंतरच खानावळ प्रत्यक्ष सुरु करण्याची परवानगी असावी.

४. मुलींच्या वसतीगृहातील खानावळीकरीताचा करार अकरा महिन्याकरीता मर्यादीत असावा.

५. महाविद्यालय/विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकारी अथवा समितीस काम समाधानकारक असल्याचे खात्री झालेनंतर गरजेनुसार सदरील करार पुढील अकरा महिन्याकरीता नुतनीकरण करता यावा. मात्र त्याचे संपूर्ण अधिकार महाविद्यालय प्रमुखाकडे राखून ठेवण्यात यावेत.

६. ज्या कंत्राटदाराची निवीदा स्विकृत झाली असेल अशा कंत्राटदाराकडून कंत्राट प्रत्यक्ष सुरु होण्याआधी सुरक्षा ठेव म्हणून किमान रु. २५,०००/- महाविद्यालयाकडे जमा करणे बंधनकारक असावे. यावर कोणतेही प्रकारचे व्याज देय असू नये.

७. सुरुवातीचे मासिक भाडे किमान रु. ४०००/- असावे. ते प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात महाविद्यालयाकडे जमा करावे. दोन महिन्यांपेक्षा जास्त भाडे थकीत ठेवल्यास त्यावर दरमहा १०% प्रमाणे व्याज आकारावे.

८. विद्युत भाडे मीटर रिडींग नुसार कंत्राटदाराने दरमहा भरणे बंधनकारक राहील. त्यासाठी महाविद्यालयाने वेळोवेळी ठरवून दिलेला दर कंत्राटदारास बंधनकारक असावा.

९. कंत्राटदार अथवा त्यांच्या कर्मचाऱ्यांचे वसतिगृहाच्या खानावळीतून महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्याव्यतिरिक्त बाहेरील कोणत्याही व्यक्तीस जेवण/डबे पुरवू नयेत. तसेच वसतिगृहाच्या खानावळीत दुसरा कोणताही व्यवसाय किंवा अनधिकृत वर्तन करू नये.

१०. वसतिगृहातील मुलींना कंत्राटदार अथवा त्यांच्या कर्मचाऱ्यांकडून कुठल्याही पद्धतीचा त्रास होणार नाही ह्याची दक्षता आणि जबाबदारी कंत्राटदाराने घ्यावी.

११. खानावळ चालवीत असतांना वसतिगृहातील मुलींची सुरक्षितता धोक्यात येईल असे कोणतेही वर्तन कायदेशीर कार्यवाहीस पात्र असावे. त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असावी.

१२. कंत्राटदार अथवा त्यांच्या कर्मचाऱ्याने महीला वसतीगृहातील प्राध्यापक, कर्मचारी किंवा विद्यार्थीनीसोबत कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्याचे आढळल्यास कंत्राटदारावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

१३. वसतिगृहातील मुलींप्रती कंत्राटदार अथवा त्यांच्या कर्मचाऱ्यांचे वर्तन अदबीचे असावे. अरेरावी आणि असंसदीय भाषेचा वापर करू नये.

१४. कंत्राटदाराकडे आवश्यक तेवढे स्वतःचे मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. महाविद्यालयाकडून कामगार पुरवले जाऊ नयेत.

१५. कंत्राटदाराकडे महिला कर्मचारी असणे आवश्यक आहे. पुरुष कर्मचाऱ्यांना केवळ स्वयंपाक घरात कामापुरता प्रवेश मर्यादित असावा.

१६. खानावळीत काम करतांना कर्मचाऱ्यांची तात्पुरती निवास व्यवस्था, वाहतूक, सुरक्षा व आरोग्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कंत्राटदाराने दरवर्षी त्यांची आरोग्य तपासणी

करून महाविद्यालयास अहवाल सादर करणे आवश्यक करावे. एखाद्या महिला कामगाराला स्वयंपाकघरात/ वसतिगृहात राहायचे असल्यास महाविद्यालयाच्या सक्षम अधिकाऱ्याकडून पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१७. खानावळीत बालमजूर कामावर ठेवता येणार नाहीत.

१८. खानावळी मध्ये कामावर असलेल्या कामगारांचे अधिकृत ओळखपत्र (आधार कार्ड, मतदान कार्ड इ.) सादर करणे बंधनकारक असावे.

१९. महाविद्यालयाकडून खानावळीत उपलब्ध करून दिलेल्या सर्व उपकरणांची जपणूक, देखभाल व दुरुस्ती खर्च तसेच इंधन (गॅस) पुनर्भरण खर्च कंत्राटदाराने स्वतः करावा लागेल. महाविद्यालयाने पुरवलेल्या स्वयंपाकाच्या नवीन वस्तू आणि उपकरणे निकामी किंवा गहाळ झाल्यास भरपाई कंत्राटदाराकडून करण्यात येईल.

२०. वसतिगृहात उपलब्ध पाणी, वीज इत्यादींचा वापर आवश्यक तेवढाच करावा. पाणी तापविणे, स्वयंपाक अथवा तत्सम बाबींसाठी विद्युत वापर करता येणार नाही.

२१. विद्यार्थिनींकडून खानावळीचे दरमहा भाडे गोळा करून देणे तसेच कंत्राटदार उधारीवर जेवण उपलब्ध करून देत असेल तर ती उधारी वसूल करण्याची जबाबदारी महाविद्यालय/सक्षम अधिकारी/समिती यांनी घेऊ नये.

२२. विद्यार्थिनींचे पालक जर खानावळीत जेवण्यास आले तर त्यांच्यासाठी जेवण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल. त्याकरिता कंत्राटदाराने ठराविक गेस्ट चार्ज घेण्यास हरकत नाही. मात्र गेस्ट चार्ज अवास्तव असू नये.

२३. कंत्राटदाराने खानावळीची स्वच्छता राखावी तसेच अन्न सकस, ताजे व स्वच्छ शिजवून द्यावे. खानावळीतील डाईनींग हॉल/स्वयंपाकघर/भांडी/कटलरी/क्राकरी/फर्निचर इ. वस्तूंची देखरेख व स्वच्छता ठेवणे ही कंत्राटदाराची जबाबदारी राहील.

२४. कंत्राटदाराने खानावळीतील जेवण महाविद्यालयाने पुरविलेल्या खाद्यपदार्थांच्या यादीनुसार देय राहील. नाश्ता, चहा, दूध, कॉफी, जेवण यांचे दर महाविद्यालयाने ठरवून दिल्यापेक्षा जास्त नसावेत. दर पत्रकाचा स्वयंस्पष्ट फलक प्रथम दर्शनी लावण्यात यावा.

२५. महाविद्यालयाकडून समिती मार्फत खानावळीत स्वच्छतेची नियमित देखरेख तसेच खाद्यपदार्थांची चव आणि गुणवत्ता ह्याची वेळोवेळी/अचानक तपासणी व्हावी. त्यासाठी समिती सदस्य/वसतिगृह प्रमुख/सहयोगी अधिष्ठाता/सक्षम अधिकारी यांना तपासणीवेळी वसतिगृहाच्या खानावळीत विद्यार्थिनींसाठी तयार केलेले जेवण निशुल्क उपलब्ध करून देणे कंत्राटदारास बंधनकारक असावे.

२६. चहा नाश्त्याची वेळ सकाळी ७ ते ९, दुपारचे जेवण १२.३० ते २.३० आणि रात्रीचे जेवण ७ ते ९ ह्या वेळेत कंत्राटदाराने उपलब्ध करावे.

२७. करार रद्द करावयाचा असल्यास एक महिना अगोदर तशी लेखी सूचना एकमेकांस द्यावी अन्यथा ठेव म्हणून जमा असलेल्या रकमेचा परतावा मिळणार नाही.

पशुवैद्यक महाविद्यालय उदगीर
जावक क्रमांक 2060
दिनांक 06/07/22

२८. कराराचे नुतनीकरण करायचे किंवा नाही तसेच कोणत्याही क्षणी नियम व अटींमध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा करण्याचे अधिकार महाविद्यालयाकडे राखीव असतील.

२९. झालेला करार हा कायमस्वरूपी असणार नाही व तो कोणत्याही वेळी आवश्यक सुचना देउन रद्द करता येईल.

३०. कंत्राटदाराचा खानावळीचा करार संपुष्टात आल्यानंतर सुरक्षा ठेव परत केली जाईल. तथापी खानावळीतील स्थायी मालमत्तेचे नुकसान झाल्यास सदरहू रक्कम सुरक्षा ठेव मधून वजा करण्यात येईल.

३१. विद्यापीठाने/महाविद्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांचे/आदेशांचे पालन करणे कंत्राटदार आणि त्यांच्या कर्मचाऱ्यास बंधनकारक असावे.

सदस्य/सचिव
डॉ. पी. एम. धुळे
शरीररचनाशास्त्र विभाग
प.वै.म. उदगीर

सदस्य
(ग.रा. पवार)

सदस्य
(प्रो. रा. यादव)

सदस्य

अध्यक्ष
सहाय्यक प्राध्यापक
सुक्ष्मजीवशास्त्र विभाग
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

सदरील नियम, अटी आणि शर्तीना दिनांक ०१/०७/२०२२ रोजी संपन्न झालेल्या १४२ व्या महाविद्यालय सल्लागार समितीने सर्वानुमते मान्यता प्रदान केलेली आहे.

सहयोगी अधिष्ठाता



आवक क्रमांक २०६०
दिनांक ०६/०७/२२
उदगीर